श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर,पिन - ४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८८५३, फॅक्स नं.२५८८७०
(***Website*** *-www.shrisaibabasansthan.org.in, www.sai.org.in*)

# !! जाहीर आवाहन !! (मुदतवाढ)

श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत **"मोतीचुर लाडू तयार करण्याचे स्पर्धेचे"** आयोजन करण्यात येत आहे.

तरी स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणा-या सर्व इच्छुक केटरर्स/ठेकेदार / महिला संस्था यांना आवाहन करणेत येते की, ज्यांना सदर स्पर्धेत सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी आपले अर्ज laddu@sai.org.in या ई-मेलवर अथवा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ता.राहाता, जि. अ.नगर पीन नं. ४२३१०९ या पत्त्यावर टपालाने कार्यालयीन वेळेत (रविवार व्यतिरिक्त) दि.०७/१०/२०२२ रोजीपर्यंत आवक विभागास पाठविण्याचे करावे.

## स्पर्धेच्या अटी-शर्ती

१. स्पर्धकाने पाकिटावर आपले संपुर्ण नाव, पत्ता व दुरध्वनी/मोबाईल क्रमांक व "लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग- लाडू तयार करावयाच्या स्पर्धेत सहभाग घेणेबाबतचा अर्ज" असा स्पष्ट उल्लेख करावा.
२. स्पर्धेकामी आवश्यक लागणारा कच्चा माल, इंधन व भांडी श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत आपणास पुरविण्यात येईल.
३. सर्व स्पर्धकांना संस्थानने दिलेल्या कच्च्या मालापासुन उत्तम प्रतिचे मोतीचुर बुंदी लाडु तयार करून द्यावे लागतील, त्यासाठी १० कि.ग्रॅ. साखरेचे प्रमाण गृहीत धरुन आवश्यक असणा-या किराणा मालाची यादी अर्जासोबत सादर करावी लागेल. स्पर्धकाने अर्जासोबत दिलेल्या यादीनुसारच किराणा माल उपलब्ध करुन दिला जाईल. स्पर्धकाने दिलेल्या यादीमध्ये ऐनवेळी बदल करता येणार नाही.
४. स्पर्धकाने मोतीचुर बुंदी तळणेकामी आवश्यक साहित्य (उदा.झारे, कौचे, प्लास्टीक मग, हॅन्डग्लोज,ॲप्रोन व टोपी इ.) स्वः खर्चाने आणावयाचे आहेत.
५. स्पर्धकास मदतनीसची आवश्यकता असल्यास, तेही स्वत: आणावयाचे आहेत, त्याचे कोणतेही मानधन अथवा पगार संस्थानमार्फत अदा करण्यात येणार नाही /मागणी करता येणार नाही.
६. सदर स्पर्धा श्री साई प्रसादालयाचे शेजारील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे किचनमध्ये आयोजित करण्यात येणार असल्याने दैनंदिन एका स्पर्धकास स्पर्धेसाठी उपस्थित राहावे लागेल, त्यासाठी निश्चित केलेली तारीख स्पर्धकास दुरध्वनीवरुन स्वंतत्ररित्या कळविणेत येईल.
७. नेमुन दिलेल्या तारखेस स्पर्धकास लाडु विभागाचे किचनमध्ये सर्व आवश्यक साहित्यानिशी सकाळी ०९.३० वाजता उपस्थित राहणे गरजेचे राहिल.
८. सदरची स्पर्धा लाडू प्रसादाची गुणवत्ता सुधारणेकामी रेसीपीची निश्चिती करावयाची असल्याने, स्पर्धेकास कोणत्याही प्रकारचे मानधन अदा केले जाणार नाही किंवा मागता येणार नाही.
९. स्पर्धकांची व त्यासोबत मदतनिसांची एक वेळ जेवणाची व्यवस्था संस्थानचे श्री साई प्रसादालयात करण्यात येईल.
१०. स्पर्धकाने स्पर्धा झाल्यानंतर त्याच्या कामाचा अहवाल व रेसीपीची पद्धत लेखी स्वरूपात ताबडतोब लाडू प्रसाद निर्मिती विभागाकडे सादर करावयाची आहे.
११. उशीरा आलेल्या ई-मेल अथवा अर्जाचा विचार केला जाणार नाही.
१२. एखाद्या स्पर्धकाची अथवा सर्व स्पर्धकांची स्पर्धा घेण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे.

(स्वाक्षरींत/- XXX)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी,